भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र.२७७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २०/०४/२०१७

१) संगनमत करून शारीरिक व मानसिक त्रास देवुन भांडन, शिवीगाळ व मारपिठ करून मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :–

दि. २६/०४/२०१६ चे आजपावेतो यातील फिर्यादी हीचा आरोपी क्र. हा पती असुन आरोपी क्र. २ व ३ सासु सासरे लागतात यातील फिर्यादीला आरोपी क्र. १ ते ३ यांनी संगनमत करून शारीरिक व मानसिक छळ करून त्रास देण्यासे सुरू केले व दि. १७.०४.२०१७ ला माझे घरी राहु नको मला सोडुन जा असे म्हणुन डावे डोळयाचे भुवईवर हाताबुक्यांनी मारून जखमी केले व शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे लेखी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४९८(अ),३२४,५०४,५०६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि चाबुकस्वार पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहे.

२) डि.पी. चे नट बोल्ट काढुन विदयुत ऑईल चोरी केल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक १८+१९/०४/२०१७ चे रात्र दरम्यान यातील अज्ञात आरोपीने विदयुत विभाचे चपराळ शेतशिवारातील डि.पी. चे नट बोल्ट काढुन त्यातील १४० लीटर विदयुत आईल किंमती ९,०००/रू. चा चोरून नेल्याने फिर्यादी राधेशाम श्रीराम देवगडे वय ३५ वर्ष रा. लाखांदुर, सहाय्यक अभियंता म.रा.वी.वी. कंपनी लाखांदुर यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३७९ भादंवि. सहकलम १३६(१) भा.वि. का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि निंबेकर पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

३) जुन्या कारणावरून विवाहीत महिलेचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक २०१६ ते आज पावेतो आतील आरोपीने फिर्यादीला तीचे सोबत असलेल्या जुन्या प्रेमसंबधाची माहीती पतीला व नातेवाहीकांना सांगण्याची धमकी देवुन फिर्यादीचे ईच्छेविरूध्द मोबाईल मध्ये तीचे अश्लिल फोटो काढुन अश्लिल नावाचे सहा वॉटसअॅप ग्रुप तयार करून त्यावर प्रेशीत करून विनयभंग करून तीचे ईच्छेविरूध्द वारंवार फोन करून त्रास दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३५४,(अ) (क)(ड), २९२ भादवि. सहकलम ६७,६७(अ) माहीती तंत्रज्ञान अधि. २००० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनि. गीते पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

४ क्षुल्लक कारणावरून लोखंडी फुंकनीने डोक्यावर मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक १९/०४/२०१७ चे ०७.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी हा संडास कडुन घरी येत असता घराचे आवारात यातील आरोपीने लटकवुन ठेवलेली दुधाची बादली फिर्यादीचे डोक्याला लक्ष न असता लागल्याने त्यातील अर्धा लीटर दुध सांडल्यावरून आरोपीने भांडन करून लोखंडी फुंकनीने फिर्यादीचे डोक्यावर उजव्या बाजुला मारून जखमी केल्याने फिर्यादी मनोज मारोती हरकंडे वय २५ वर्ष रा. इंदुरखा यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३२४,५०४ भादवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. उईके पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

५) हेतुपुरस्पराहितपणाने काडी कचरा पेटविल्याने शेतातील तनस,गव्हांडा,पाईप जळुन नुकसानी केल्याने गुन्हा नोंद :—

दिनांक १६/०४/२०१७ चे ०८.०० वा. ते १३.०० वा दरम्यान यातील फिर्यादी व आरोपी हे शेजारील कास्तकार असुन यातील आरोपीने आपले शेताशेजारील काडी कचरा पेटविण्याकरिता आग लावली होती आरोपीने निष्काळजीपणा केल्याने ती आग फिर्यादी व शेताशेजारील शेतकरी गोपाल आस्वले, मंगल आस्वले यांची तनस ,गव्हांडा व प्लॅस्टीक पाईप अशी एकुन ११,०००/रू. ची नुकसानी करण्यास हेतुपुरस्पर कारणीभुत झाल्याने फिर्यादी नाना श्रावन भुते वय ६५ वर्ष रा. इंदुरखा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ४३५ भादवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. उईके पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

६) अवैध दारु अड्डयावर / जुगारावर धाडी . :—

दिनांक १९/०४/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे भंडारा,मोहाडी,करडी,गोबरवाही,लाखनी, पवनी, लाखांदुर, येथे अवैध दारु अंडयावर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन १८ लिटर हा.भ.दारू किंमती ९५०/—रु, ४ लिटर ३२० मीलीलीटर देशी दारू किंमती १,२००/रू. असा एकुण किंमती २,१५०/—रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक १८/०४/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुन ७३ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०३, तीन सिटर वाहनांवरती ०३ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ६७ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करिता
दुरध्वनी.क्र.९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.